महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एलजेआर-१९२५/.क्र.१६१/२०२५/जाहिरात **दिनांक : १४ नोव्हेंबर, २०२५**

-: प्रसिद्धीपत्रक :-

विषय :- दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग २०२५ परीक्षेबाबत
संदर्भ :- शासन पत्र, विधि व न्याय विभाग क्रमांक: क्रमांक: सीजेएम-१३२५/८९२/प्र.क्र.१४७/कार्या-३, दिनांक १३ ऑक्टोबर, २०२५, सोबत मा. उच्च न्यायालयाचे क्रमांक ए-५५०४/२०२५/१५०४, दिनांक १४ ऑगस्ट, २०२५, रोजीचे पत्र

शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या उपरोक्त संदर्भिय दिनांक १३ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा २०२५ करीता एकूण २४० पदांचे मागणीपत्र प्राप्त झाले आहे. तथापि, विषयांकित संवर्गाकरीता मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन(दिवाणी) क्रमांक १०२२/१९८९ (All India Judges Association and others Vs. Union of India and Others) मधील मा. न्यायालयाच्या न्याय निर्णयानुसार महाराष्ट्र न्यायिक सेवा (नियम) २००८ मध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु असून सदर सुधारणा अद्याप अधिसूचित झाल्या नसल्यामुळे, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा २०२४ प्रमाणेच दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा २०२५ ची भरती प्रक्रिया महाराष्ट्र न्यायिक सेवा (नियम) २००८ मधील सुधारणा अधिसूचित होईपर्यत आस्थगित (Abeyance) ठेवण्याबाबत शासनाने कळविले आहे.

२. यास्तव, शासन तसेच मा. उच्च न्यायालयाकडून पुढील सूचना प्राप्त झाल्यानंतर दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग परीक्षा २०२५करीता जाहिरात प्रसिद्ध करण्यात येईल.

उप सचिव(जाहिरात),
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.